# गाणं गोडच हवं

दिवाळीसारख्या सणी नवे कपडे घालण्यात किंवा निरनिराळे गोड खाद्यपदार्थ खाण्यात जसा आपण आपला आनंद व्यक्त करतो, त्याप्रमाणे एखादं गोड गाणं ऐकण्यात सुद्धा आपला आनंद द्विगुणीत होतो हे स्वाभाविक आहे. दिवाळीच्या दिवशी पाहटेस एखादं गोड भजन कानावर पडलं तर तो आनंद वेगळाच असतो. उदाहरणार्थ पं. भीमसेन जोशी यांचं भजन "माझा भाव तुझे चरणी" किंवा छोटा गंधर्वांचं भजन "बोलू ऐसे बोल जेणे बोले विठ्ठल डोले". या भजनांत अवीट गोडवा आहे आणि तो अवर्णनीय आहे. तर हा गोडवा एखाद्या गाण्याला अमर करून जातो. लोक कित्येक वर्षं, किंबहुना कित्येक पिढ्या ते गाणं गुणगुणत फिरत असतात. अशा वेळी, गाणं हे गोडच असावं या संदर्भात मला माझे विचार मांडावेसे वाटतात.

पुरषोत्तम दारव्हेकरांचं नाटक "कट्यार काळजात घुसली" याने कांही वर्षांनंतर पुन्हा एकदा लोकांच्या आवडीचा उच्चांक गाठला, महाराष्ट्रात आणि अमेरिकेत कांही शहरी लोकांची गर्दी पाहण्यासारखी होती. याचं मुख्य कारण त्यातलं प्रभावी संगीत, पण विशेषतः "घेई छंद मकरंद" त्या नाटकातल्या हिंदू गवयाने (प्रसाद सावकार यांनी) सादर केलेलं शांत लयीतलं गाणं. तेच गाणं मुसलमान गवयाने (वसंतराव देशपांडेंनी) फार तडफदार पद्धतीने सादर करून सुद्धा गोडव्याच्या बाबतीत मागे पडते. अगोदरच्या गाण्यातला गोडवा हृदयाला एकदम भिडतो. मागे वळून पाहिलं तर तसा गाण्यातला गोडवा आपल्याला छोटा गंधर्वांच्या गाण्यांत सापडतो. १९५० ते १९७० या काळात त्यांनी नाट्यगीतांच्या गाण्यातला गोडव्याचा कळस गाठला होता अस म्हणावं लागेल. "दिलरुबा मधुर हा दिलाचा", "सुखवी तया संसारा", "रजनीनाथ हा नभी उगवला", "छळी जीवा दैव गती", "प्रिये पहा, रात्रीचा समय सरुनी" अशा त्यांच्या अनेक गाण्यांनी मराठी मनावर अधिराज्य केलं. अजूनसुद्धा कितीतरी गाणारे आपल्या मैफिलीमध्ये ही गाणीं न चुकता सादर करीत असतात व तोच त्यांच्या गोडव्याचा  पुरावा आहे. त्याच्या अगोदर म्हणजे १९०५ ते १९३० काळांत, बालगंधर्वांनी लोकांना त्यांच्या गोड नाट्यगीतांनी वेडं केलं होत.  सौभद्र नाटकातील "वद जाऊ कुणाला शरणा गं", 'संशयकल्लोळ' मधील "संशय का मनी आला", व "मजवरी तयांचे प्रेम खरे". 'मूकनायक' मधील "उगीच कांता गांजिता", तसंच 'मानापमान' नाटकातील "खरा तो प्रेमा ना", "मला मदन भासे हा", "मी अधना",  'स्वयंवर' मधील "नाथ हा माझा". "मम आत्मा गमला",  "नरवर कृष्णा समान", "अमृतची गोपाला" व शेवटी 'एकच प्याला' मधील "दया छाया घे", "सत्य वदे वचनाला", व "प्रभू अजी गमला",  ही नाट्यगीतं ऐकावी म्हणजे गाण्यातला गोडवा याला किती महत्व आहे हे स्पष्ट होते. तो काळ माझ्या जन्माच्या अगोदरचा असल्या कारणाने मला त्या बाबतीत अधिक  बोलण्याचा अधिकार नाही असं म्हणावं लागेल. पण त्याच काळात किराणा घराण्याचे अब्दुल करीम खान यांचं गाणं इतकं गोड़ व भावनाप्रधान होतं की तसं गाणं पुन्हा होणं कठीण आहे. त्यांचं स्वर्गीय गाणं

ऐकण्याचं भाग्य मला लाभलं नाही कारण ते बालगंधर्वांचे समकालीन होते, परंतु त्यांची किराणा गायकी शिकण्याची संधी त्या घराण्याच्या जेष्ठ गवयाकडून, पं. फिरोझ दस्तुरांच्याकडून मिळाली ही ईश्वरी कृपा असावी. मला सांगायला विशेष अभिमान वाटतो की ते माझ्या गुरूच्या गुरूचे गुरू होते. माझे गुरू प. फिरोझ दस्तूर होते व त्यांचे गुरू सवाई गंधर्व होते, तर सवाई गंधर्वांचे गुरू अब्दुल करीम खान होते. गाण्यातला गोडवा याच प्रतीक अनुभवायचं असेल तर अब्दुल करीम खानच्या ध्वनिमुद्रिका "गोपाला मेरी करुणा क्यू नही आवे", "पिया बिन नाही आवत चैन", "पियाको मिलनकी आस" या ऐकाव्यात. त्यांत त्यांनी गोडव्याची सीमा गाठली आहे. सिनेसंगीताच्या प्रांताबद्दल बोलायचं तर कुंदनलाल सैगल यांचं गोड व हृदय हलवणारं गाणं अप्रतिम होत. त्यांच्या "मै क्या जानू क्या जादू है"(चित्रपट-'जिंदगी' १९४०), "बाबूल मोरा" व "अय कातिबे तकदीर मुझे इतना बता दे" (चित्रपट-'स्ट्रीट सिंगर' १९४४) "चाह बरबाद करेगी हमे" व "जब दिल ही टूट गया" (चित्रपट-'शाहजहान' १९४५) ह्या ध्वनिमुद्रिका ऐकल्यावर असं वाटतं की ईश्वराने त्यांच्या गळ्यात असा काय गोडवा किंवा आर्तता ठेवली होती की ऐकणाऱ्याच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या गाण्याचा प्रभाव इतका होता की त्यांच्या नंतरचे गाणारे सी. एच. आत्मा, मुकेश आणि तलत मेहमूद त्यांची नक्कल करण्यात स्वतःला धन्य समजत. मोहमद रफी, तलत मेहमूद आणि लता मंगेशकरांनी याच गुणाने लोकांच्या मनाचा ठाव घेतला आणि सिनेसंगीत अजूनपर्यंत जिवंत ठेवलं आहे. त्यांच्या अनेक गोड़ गाण्यांची यादी इथे देणं कठीण आहे. परंतु इथे नमूद करावं लागेल की या संगीतातल्या गोडव्याचं पुष्कळसं श्रेय नौशाद, अनिल बिश्वास, खेमचंद प्रकाश, गुलाम हैदर, गुलाम मोहमद, सी. रामचंद्र, खय्याम व रोशन अशा संगीतदिग्दर्शकांना द्यावं लागेल. त्यानंतरच्या पार्श्वगायकांनी ही जवाबदारी कितपत सांभाळली आहे हे वादग्रस्त आहे, अर्थात काळाप्रमाणे हे संगीत बदलत गेलं आहे आणि ते त्या प्रवाहात वाहत गेले आहेत असं म्हणायचा मोह होतो. गझल या गाण्याच्या प्रकारात बेगम अख्तर उर्फ अख्तरीबाई फैझाबादी यांच्यासारख्या गझला अजून कोणी गाऊ शकत नाही असं मला वाटतं. त्यांचा गोडवा आणि आर्तता त्यांच्या गझलांत इतका ओतप्रोत आहे की तो त्यांचं खासगी जीवन प्रतिबिंबीत करतो. त्यांच्या गझलां "ऐ मोहब्बत तेरे अंजामपे रोना आया", "हमको मिटा सके जमानेमे दम नही", "ये न थी हमारी किस्मत, के विसाले यार होता" त्यांच्या उंच स्वरात, तंबोऱ्यात घुसणाऱ्या आवाजात ऐकल्या की हृदयाला पीळ पडतो, वाटते की या बाईच्या आवाजात ईश्वराने इतकं दुःख भरून ठेवलं आहे की त्याची खोली अजमावता येत नाही, पण ते दुःख सादर करताना त्या त्यांच्या गाण्यातला गोडवा विसरत नाहीत हे सर्वात महत्वाचं आहे.

"गोडवा" ही कुठल्याही गाण्याची प्रमुख बाजू आहे. तेंव्हा त्यातली तांत्रिक बाजू याला दुय्यम स्थान देणं हे क्रमप्राप्त आहे, म्हणजे लय, ताल किंवा सरगम हे घटक तितके महत्वाचे नाहीत. गाणं पद्धतशीर करण्यासाठी त्यांचा उपयोग केला जातो. जर त्यांनी गाण्याच्या गोडव्यावर कुरघोडी केली तर कुठलही गाणं जिवंत न राहून ते टिकत नाही. अब्दुल करीम खान म्हणायचे "ताल गया तो बाल

गया लेकिन सूर गया तो सर गया". वरील गाणी नीट ऐकली तर आपल्याला आढळते की जलद लयीला, तालाला किंवा गाण्यात सरगम म्हणायला महत्व दिलं गेलं नाही. जिथे सरगम म्हटलं आहे ते केवळ गाण्याच्या गोडव्याला पूरक म्हणून म्हटलं गेलं आहे. हिराबाई बडोदेकर किंवा भीमसेन जोशी यांच्या ध्वनिमुद्रिकेत सरगमचा उपयोग मुळीच आढळत नाही. गेल्या काही वर्षांत विशेषतः शास्त्रीय गाण्यात सरगमचा व अती जलद लयीचा भरमसाट उपयोग केला गेला आहे. असं वाटतं की ते गवई त्यांचं गाणं लोकांच्या हृदयाकडे  पोहचवण्यापेक्षा त्यांचं पांडित्य किंवा तय्यारी दाखवण्याच्या खटपटीत आहेत.

गोडव्याच्या संदर्भात, ६० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनात छोटा गंधर्वांचे अध्यक्षीय भाषणातले (२३ फेब्रुवारी १९८०) बोल लाखाचे आहेत. ते बोलतात, "संगीत दिग्दर्शकांनी आपली विद्वत्ता व ज्ञान दाखविण्यापेक्षा आपले संगीत नाटकाला परिपोषक कसे होईल याकडे जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. मला जुन्याचे प्रेम व नव्याचे आकर्षण आहे.
तरीही असे म्हणावे वाटते की जुने ते जुनेच राहू द्या. दुसरे नवे जरूर करा. पण जुन्याला नवे बनवू नका. त्याला आधुनिक "टच" देऊ नका.. गाणे मग ते नाटकातले असो की कोणतेही असो -- ते गोडच असायला पाहिजे. जे गोड़ नाही ते गाणंच नाही. जशी साखर ही गोडच पाहिजे तरच तिला साखर ही संज्ञा प्राप्त होते. मुखाशी आणि कानाशी ज्या गोष्टींचा संबंध येतो, त्या गोष्टी गोडच हव्यात."

**पं. सुजन राणे, प्लेन्सबोरो, न्यू जर्सी**
panditsujanrane@gmail.com
(पूर्वप्रसिध्दी : 'रंगदीप' २०१६)